# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**

**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता.जि.ठाणे**

**फोन नं. ०२२-२९४५१००१**

Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनाट क्रमांक ३१७-२२** **दिनांक १९/१०/२०२२**

## ऑटो रिक्षा चोरी करणा-या सराईत आरोपीतास अटक.
## पेल्हार पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक २४/०६/२०२२ रोजी रात्रौ १२.३० ते ०५.३० वा. च्या सुमारास फिर्यादी नामे श्री. रंजित निर्मल बिंद, वय ३४ वर्षे, व्यवसाय -रिक्षा चालक, रा.ठि. रु.नं.५, साई नगर, वाकनपाडा, दुर्गा माता मंदिरामागे, वसई पुर्व यांनी त्यांची ऑटो रिक्षा एम.एच. ४८ बी एफ ०१३२ ही साईनगर, धानीव बाग येथे पार्क करुन ठेवली असता कोणीतरी अज्ञात चोरटयाने फिर्यादी यांच्या संमतीशिवाय चोरी केल्याची तक्रार फिर्यादी यांनी पेल्हार पोलीस ठाणे येथे दिल्यावरुन गुन्हा रजि.नं. ५५६/२०२२ भां.दं.वि.सं. कलम ३७९ अन्वये नोंद करण्यात आला होता.

पेल्हार पोलीस ठाणे हद्दीत ऑटो रिक्षा चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याने मा. वरिष्ठांनी सदर गुन्हयांना आळा घालण्यासाठी व दाखल गुन्हयांची उकल करण्यासाठी दिलेल्या सुचनांचे आधारे पेल्हार गुन्हे प्रकटीकरण शाखेचे अधिकारी व अंमलदार यांनी गुप्त बातमीदार यांचेकडुन मिळालेल्या माहितीचे व तांत्रिक माहितीच्या आधारे इसम नामे १) आकाश जयवंत पाटील, वय २२ वर्षे, व्यवसाय-चालक, रा. वागराळ पाडा, भोयदापाडा, वसई पुर्व, ता. वसई, जि. पालघर यास ताब्यात घेवुन त्याचेकडे विचारपुस करता त्याचा नमूद गुन्हयात सहभाग निष्पन्न झाल्याने त्यास दिनांक १६/१०/२०२२ रोजी अटक करण्यात आली आहे.

नमूद आरोपीताकडे केलेल्या तपासात त्याने पेल्हार पोलीस ठाणे, वालीव पोलीस ठाणे हद्दीत तुंगारेश्वर, शांतीनगर, बोयदापाडा, वाकनपाडा, नाईकपाडा येथे रिक्षा चोरी केल्याचे निष्पन्न झाले असून त्याच्याकडुन ६,१०,०००/- रुपये किंमतीचा मुददेमाल हस्तगत करण्यात आला आहे.

**उघडकीस आलेले गुन्हे खालीलप्रमाणे –**

| अ.क्र. | पोलीस ठाणे | गु.र.क्र. व कलम |
|---|---|---|
| १. | पेल्हार पोलीस ठाणे. | गु.रजि.नं. I ५५६/२०२२, भा.दं.वि.सं. कलम ३७९,३४ प्रमाणे. (मुळ गुन्हा) |
| २. | पेल्हार पोलीस ठाणे. | गुन्हा रजि.नं.८२२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ३. | पेल्हार पोलीस ठाणे. | गुन्हा रजि.नं. ८५७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ४. | पेल्हार पोलीस ठाणे. | गुन्हा रजि.नं. ६१२/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाण. |
| ५. | वालीव पोलीस ठाणे. | गुन्हा रजि.नं. ९७७/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |
| ६. | वालीव पोलीस ठाणे. | गुन्हा रजि.नं. १०५५/२०२२ भा.दं.वि.सं. कलम ३७९ प्रमाणे. |

सदरची कामगिरी श्री. प्रशांत वाघुंडे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ ३ विरार, श्री. रामचंद्र देशमुख, सहायक पोलीस आयुक्त, विरार विभाग यांचे मार्गदर्शनाखाली पेल्हार पोलीस ठाण्याचे श्री. विलास चौगुले, वरिष्ठ पोलीस निरीक्षक , श्री. अमर मराठे, पोलीस निरीक्षक (प्रशासन), गुन्हे प्रकटीकरण शाखेचे पो.उप.नि. सनिल पाटील, पो.हवा. योगेश देशमुख, तुकाराम माने, तानाजी चव्हाण, पो.ना.प्रताप पाचुंदे, पो.अं. संदिप शेळके, मोहसिन दिवाण, सचिन बळीद, रोशन पुरकर, बालाजी गायकवाड, किरण आव्हाड यांनी पार पाडलेली आहे.

-----------ooooooo------------